# EDUCATION

## Paper III

## शिक्षणशास्त्र

## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 200**

*Instructions* :—This paper has **four (4)** Sections. Each Section has its own separate instructions regarding the length of the answer, the choice of questions, and the marks assigned to each question to be answered. There are totally **Nineteen (19)** questions to be answered. Maximum marks are **200.**

**सूचना** : या प्रश्नपत्रिकेत एकूण **चार (4)** भाग आहेत. प्रत्येक भागात त्या भागाच्या स्वतंत्र सूचना दिल्या आहेत. त्यात उत्तराची अपेक्षित लांबी, प्रश्नाची निवड व प्रत्येक प्रश्नाला असलेल्या गुणांविषयी माहिती आहे.

एकूण **19** प्रश्नांची उत्तरे देणे आवश्यक आहे. कमाल गुण **200** आहेत.

### SECTION I

### (भाग I)

*Instructions* :—In this section you have to attempt **2 (Q. No. 1 and Q. No. 2)** questions in about **500** words. Each question is assigned **20** marks.

**सूचना** :– ह्या भागामध्ये तुम्हाला प्रत्येकी 500 शब्दांत 2 **(प्र. क्र. 1 व प्र. क्र. 2)** प्रश्नांची उत्तरे लिहावयाची आहेत. प्रत्येक प्रश्नाला 20 गुण आहेत.

1. Explain the term 'System'. Explain with the help of an example, how education can be termed as a system and how its different parts are inter-related.

'प्रणाली' ही संज्ञा स्पष्ट करा. शिक्षणाला ही आपण प्रणाली म्हणू शकतो आणि शिक्षणाच्या विविध भागांचा एकमेकांशी आंतरसंबंध असतो, हे सोदाहरण स्पष्ट करा.

*Or*/**(किंवा)**

Enumerate tools and techniques of data collection. Distinguish between tools and techniques of data collection. Explain the method of developing a questionnaire.

माहिती संकलनाची तंत्रे व साधने यांची यादी करा. माहिती संकलनाची साधने आणि तंत्रे यामध्ये तुलना करा. प्रश्नावली विकसनाची पद्धती स्पष्ट करा.

*Or*/**(किंवा)**

Explain the multimedia approach in Educational Technology. How will you use this approach for teaching of your own subject in classroom ?

शैक्षणिक तंत्रज्ञानातील बहूमाध्यम उपागम स्पष्ट करा. आपला विषय वर्गात शिकविण्यासाठी हा उपागम आपण कसा वापराल ?

*Or*/(**किंवा**)

What do you mean by mentally retarded children ? What are the causes of mental retardation ? How are these children classified according to the level of mental retardation ? How are the teaching strategies used for these children different from those used for normal children ? Enumerate.

मतिमंद विद्यार्थी म्हणजे कोण ? मतिमंदत्वाची कारणे लिहा. मतिमंदत्वाच्या स्तरानुसार त्यांचे वर्गीकरण कसे करतात ? त्यांच्यासाठी वापरल्या जाणाऱ्या अध्यापनाच्या कार्यनीती सामान्य मुलांपेक्षा कशा वेगळ्या असतात हे स्पष्ट करा.

*Or*/(**किंवा**)

Explain, the existing criteria of admission and admission procedure. Mention *five* lacune in this procedure. What problems are faced by B.Ed. colleges due to this ? What recommendations will you make for smooth implementation of curriculum in B.Ed. colleges ?

सध्याच्या बी.एड्. प्रवेशाचे निकष व प्रवेशपद्धती स्पष्ट करा. या प्रक्रियेतील **पाच** उणीवा सांगा. यामुळे बी.एड्. महाविद्यालयांना कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते ? बी.एड्. महाविद्यालयामध्ये अभ्यासक्रम सुरळीतपणे राबविण्यासाठी तुम्ही कोणत्या शिफारशी कराल ?

2. You are the recently appointed principal in a newly started school. The school has appointed a mix of experienced and inexperienced teachers. In order to develop the school and ensure its reputation, which leadership style will you adopt ? Justify your answer.
नव्याने सुरू झालेल्या शाळेमध्ये आपली नव्यानेच प्राचार्य म्हणून नेमणूक झाली आहे. शाळेने अनुभवी व अननुभवी शिक्षक अशा मिश्र नेमणूका केल्या आहेत. शाळेचा विकास करण्यासाठी व शाळेच्या प्रतिष्ठेची खात्री देण्यासाठी कोणती नेतृत्व शैली आपण स्वीकाराल ? आपल्या उत्तराचे समर्थन करा.

*Or*/**(किंवा)**

What are skills ? Explain the steps of skill development. List the skills you would develop in the subject of your choice.
कौशल्ये म्हणजे काय ? कौशल्य विकसनाच्या पायऱ्या स्पष्ट करा. तुम्ही तुमच्या निवडीच्या विषयामध्ये कोणती कौशल्ये विकसित कराल त्याची यादी करा.

*Or*/**(किंवा)**

Describe the process for designing instructional strategies. What procedure would you adopt for organising seminars and tutorials for enhancing quality in higher education ?
अनुदेशन कार्यनितीचा आराखडा तयार करण्याची प्रक्रिया स्पष्ट करा. उच्चशिक्षणातील गुणवत्ता वाढविण्यासाठी परिसंवाद आणि स्वाध्याय यांचे आयोजन करण्यासाठी कोणती पद्धती आपण अवलंबाल ?

*Or*/**(किंवा)**

Explain the term learning disability. What are the characteristics of children with 'learning disability'—Dyscalculia ? What adaptation strategies will you adopt for making the learning of these children effective w.r.t.—learning resources, learning environment and techniques of teaching ?
'अध्ययन अक्षमता' संज्ञा स्पष्ट करा. अध्ययन अक्षमता—डिसकल्कुलीया (Dyscalculia) असणाऱ्या मुलांची वैशिष्ट्ये लिहा. अशा विद्यार्थ्यांच्या परिणामकारक अध्ययनासाठी अध्ययन स्रोत, अध्ययन वातावरण व अध्यापनाची तंत्रे यांच्या संदर्भात तुम्ही कोणत्या अनुकुलन कार्यनीतींचा अवलंब कराल ?

*Or*/**(किंवा)**

What is the importance of secondary teacher education ? What are the recommendations done by Kothari Commission for improvement of quality teachers ? What are your suggestions to improve the quality of teachers ?
माध्यमिक शिक्षक शिक्षणाचे महत्त्व काय ? माध्यमिक शिक्षक शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी कोठारी कमिशनने कोणत्या शिफारशी केलेल्या आहेत ? माध्यमिक शिक्षकाची गुणवत्ता सुधारण्यासाठी तुम्ही कोणत्या सूचना कराल ?

## SECTION II

## (भाग II)

*Instructions* :—There are **3** (*three*) **(Q. No. 3 to Q. No. 5)** questions to be answered, each in about **300** words. These questions are based on five electives. Select *one* elective out of *Five* electives and answer **3** (*three*) questions given below it. Each question is assigned **15** marks.

**सूचना** :– या भागात 3 **(तीन)** **(प्र. क्र. 3 ते प्र. क्र. 5)** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 300 शब्दांत लिहावयाची आहेत. हे प्रश्न तुमच्या निवडीच्या पर्यायी विषयासंबंधी आहेत. त्या **पाच** पर्यायांपैकी **एक** पर्यायी विषय निवडा व त्याखालील **3 (तीन)** प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाला **15** गुण आहेत.

### Elective I

3. Explain and compare any *three* approaches to educational planning.
शैक्षणिक नियोजनाचे कोणतेही **तीन** उपागम स्पष्ट करा आणि त्यांची तुलना करा.

4. Explain the meaning and principles of supervision.
पर्यवेक्षणाचा अर्थ व तत्वे स्पष्ट करा.

5. Enumerate and explain the salient features of scientific management.
शास्त्रीय व्यवस्थापनाची नेमकी वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

*Or*/**(किंवा)**

### Elective II

3. What is meant by rating scale ? List its demerits. How do you develop an attitude scale by Likert's method ?
पदनिश्चयन श्रेणी म्हणजे काय ? त्यातील दोष सांगा. तुम्ही लिकर्ट पद्धतीने अभिवृत्ती शलाका कशी विकसित कराल ?

4. Differentiate between norm referenced and criterion referenced test. How are criterion referenced tests useful in mastery learning ?
मानक संदर्भीय आणि निकष संदर्भीय चाचणीतील फरक स्पष्ट करा. प्रमुख अध्ययनामध्ये संदर्भीय चाचण्या कशा प्रकारे उपयुक्त आहेत ?

5. What are aptitudes ? How is achievement considered a type of aptitude ? Explain the need for developing a good teaching aptitude test.
अभियोग्यता म्हणजे काय ? संपादन हा अभियोग्यतेचा प्रकार म्हणून कसा लक्षात घेतला जातो ? चांगली अभियोग्यता चाचणी विकसित करण्याची गरज स्पष्ट करा.

*Or*/**(किंवा)**

### Elective III

3. What is multi-media ? Illustrate its application teaching and learning.
बहुमाध्यम म्हणजे काय ? अध्ययन व अध्यापनामध्ये बहुमाध्यमाचे उपयोजन उदाहरणासह स्पष्ट करा.

4. "Educational technology is an umbrella term." Give your comments.
''शैक्षणिक तंत्रज्ञान ही खूप व्यापक संकल्पना आहे.'' यावर तुमचा अभिप्राय लिहा.

5. Design a strategy to apply systems approach to classroom instruction.
वर्गाध्यापनात प्रणाली उपागमाच्या उपयोजनाची व्यूह रचना स्पष्ट करा.

*Or*/(**किंवा**)

**Elective IV**

3. Enumerate the characteristics of hearing impaired children. What provisions can be made in the school with respect to physical facilities and learning resources for the successful inclusion of these children ?
कर्णबधिर मुलांची वैशिष्ट्ये लिहा. या विद्यार्थ्यांच्या यशस्वी समावेशनासाठी शाळेमधे तुम्ही भौतिक सुविधा व अध्ययन स्रोतासंबंधी कोणत्या तरतूदी कराल ?

4. Explain the meaning of 'special education'. What are the objectives of special education ? What are the principles on which special education is based ?
'विशेष शिक्षण' याचा अर्थ स्पष्ट करा. विशेष शिक्षणाची उद्दिष्टे कोणती ? विशेष शिक्षण कोणत्या तत्वांवर आधारलेले आहे ?

5. Who are gifted children ? Explain *two* best practices that can be used to meet the needs of gifted children ? What are the limitations in implementing these strategies in the Indian context ?
प्रज्ञावान मुले म्हणजे कोण ? या मुलांच्या गरजापूर्ण करण्यासाठी कोणतेही **दोन** उपक्रम स्पष्ट करा. भारतामधे या उपक्रमांची अंमलबजावणी करताना कोणत्या मर्यादा येतात ?

*Or*/(**किंवा**)

**Elective V**

3. Which are the main agencies concerned with teacher education in India ? State any *ten* functions of NCTE.
भारतातील शिक्षक शिक्षणाशी संबंधित विविध संस्था कोणत्या ? एन्.सी.टी.ई.ची कोणतीही **दहा** कार्ये सांगा.

4. What are the aims and objectives of teacher education at primary level ? What are the barriers in achieving these objectives ? What suggestions will you give to overcome the same ?
प्राथमिक स्तरावरील शिक्षक शिक्षणाची ध्येये व उद्दिष्टे कोणती ? ही साध्य करण्यातील अडथळे कोणते ? यावर मात करण्यासाठी तुम्ही कोणते उपाय सुचवाल ?

5. What do you mean by modification of teacher behaviour ? How does micro-teaching help in modification of behaviour ? How will you make micro-teaching more effective ?
शिक्षक वर्तन परिवर्तन म्हणजे काय ? शिक्षक वर्तन सुधारण्यासाठी सूक्ष्म अध्यापन कसे साह्य करते ? सूक्ष्म अध्यापन अधिक प्रभावी तुम्ही कसे कराल ?

3.

4.

5.

## SECTION III
## (भाग III)

*Instructions* :—In this section you have to answer all the **9** (**NINE**) **(Q. No. 6 to Q. No. 14)** questions, each in about **50** words. Each question is assigned **10** marks.

**सूचना** :— या भागातील सर्व **9** (**नऊ**) **(प्र. क्र. 6 ते प्र. क्र. 14)** प्रश्नांची उत्तरे लिहावयाची आहेत. प्रत्येकी प्रश्नाचे उत्तर साधारणपणे **50** शब्दांत लिहा. प्रत्येक प्रश्नाला **10** गुण आहेत.

6. Explain the salient features of idealism in view of the aims of Indian Education.

   भारतीय शिक्षणातील ध्येयांच्या संदर्भात आदर्शवादाच्या लक्षणीय वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

7. What are the constraints of social change in today's India ? How can teacher make the process of social change easier ?
भारतात आजच्या काळात सामाजिक परिवर्तनातील अडथळे कोणते आहेत ? शिक्षक ही सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया कोणत्या मार्गांनी सुलभ करू शकेल ?

8. What techniques will you use to motivate the B.Ed. students to use ICT in their teaching ?
बी. एड्च्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या अध्यापनात ICT चा उपयोग करावा म्हणून तुम्ही प्रेरणा देण्यासाठी कोणती तंत्रे वापराल ?

9. What do you mean by conflict ? Explain the types of conflicts with appropriate examples.
संघर्ष म्हणजे काय ? संघर्षाचे प्रकार योग्य उदाहरणांच्या साहय्याने स्पष्ट करा.

10. What do you mean by counselling ? How will you use cumulative record card for counselling ?
समुपदेशनासाठी संकलित नोंद पत्रकाचा उपयोग तुम्ही कसा कराल ?

11. Explain in brief any *two* qualitative research approaches.
कोणतेही **दोन** गुणात्मक संशोधन उपागम थोडक्यात स्पष्ट करा.

12. State the salient features of 'Population' and 'Sample'. Give *three* characteristics of good sample.

'जनसंख्या' आणि 'नमुना' यांची विशेष वैशिष्ट्ये सांगा. उत्तम नमुन्याचे **तीन** गुणधर्म लिहा.

13. Explain how Distance Education is useful to implement the concept 'Education for all' ?
दुरस्थ शिक्षण हे 'सर्वांसाठी शिक्षण' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी कसे उपयुक्त आहे ते स्पष्ट करा.

14. What is curriculum evaluation ? With reference to curriculum evaluation define formative and summative evaluations. Illustrate with examples for each. 2,2,2,4

अभ्यासक्रमाचे मूल्यमापन म्हणजे काय ? अभ्यासक्रमाच्या मूल्यमापनासंदर्भात आकारिक आणि समाकलित मूल्यमापनाच्या व्याख्या द्या. प्रत्येकाचे उदाहरणासह स्पष्टीकरण द्या.

## SECTION IV

## (भाग IV)

*Instructions* :— [Candidates who are answering entire paper in English language.] A paragraph is given below. Read it carefully and answer the **5** (**FIVE**) questions **(Q. No. 15 to Q. No. 19)** following it, each in not more than **30** words. Each question is assigned **5 (FIVE)** marks.

Education has been undergoing a "Creative revolution" during the past and teaching methods have changed and so has the teacher-pupil relationship. Generally the methods have moved from a predominantly teacher-directed, teacher controlled approach to a teacher pupil interactive system in which "discovery learning," is considered an integral part of the process.

The children learn through integrative sensory modalities, combining creative approaches with curricular content and the integration is so strong that there are numerous associations to help the children retain and relate what they have learned.

"Learning through doing" or the way of discovery method, leading the discovery of facts is now in use all over the world. Much of the failure of education in the world is due to so much emphasis being laid on giving information, instead of allowing the child to exercise his capacity for observation and discovery from the very beginning and more or less in his own way and time. When both the teacher and the child, hand in hand, experience the same thrill of discovery, the same flash of understanding, the conditions for the child's growth are perfect. If from the beginning the child is filled with information or shown how to do everything, he is not being allowed to take part in the game. "Discovery," is the game of "hide and seek" in the dark or making discoveries about the physical universe.

The game of discovery should spring from some perhaps casual but enquiring remarks of the student. Each can be a starting point leading to the project. All that is needed is the right relationship between the teacher and the children, so that the two way communication can be kept steady and interesting for a long time. A real flow between teacher and children takes time to establish with those who have lost the ability or inclination to communicate—those children whose creative ability has worn off because they have been given information ever since they were born and now refuse to listen or talk in protest. The mind of the child should be built upon his own discoveries and not on the discoveries of other people. If the way to discovery is followed the child will have developed his capacity to observe, to appreciate and to reason. He will be able to relate any fresh information to his own data and experience and to continue his game of discovery in any particular field of interest he may desire, be it—science, medicine, mathematics, history or economics.

**सूचना** :— जे परीक्षार्थी सर्व प्रश्नांची उत्तरे मराठी भाषेतून लिहिणार आहेत, त्यांनी खाली दिलेला परिच्छेद वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची **(प्र. क्र. 15 ते प्र. क्र. 19)** प्रत्येकी **30** शब्दांत उत्तरे लिहावीत. प्रत्येक प्रश्नास **5 (पाच)** गुण आहेत.

गेल्या काही काळात शिक्षणामध्ये एक 'सृजनशील क्रांती' घडून येत आहे आणि अध्यापन पद्धती बदलून गेल्यात, तसेच शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील संबंध देखील बदलून गेले आहेत. सर्वसाधारणपणे अध्यापन पद्धती या प्रामुख्याने शिक्षक निर्देशित, शिक्षक नियंत्रित दृष्टीकोनाकडून शिक्षक विद्यार्थी आंतरक्रियात्मक प्रणालीकडे झुकत चालल्या आहेत. या पद्धतीचा 'शोध अध्ययन' हा अविभाज्य भाग मानला जातो. मुले अभ्यासाच्या आशयामध्ये सृजनशील दृष्टीकोन मिसळून एकात्मिक संवेदी प्रक्रियेतून शिकत असतात. ही एकात्मिकता इतकी बलवान असते की त्या मध्ये मुले जे काही शिकलेली असतात त्याची धारणा पक्की होण्यासाठी असंख्य साहचर्य संबंध प्रस्थापित झालेले असतात.

कृतीतून अध्ययन किंवा जिच्या द्वारे वस्तूस्थितीचा शोध घेतला जातो अशी शोध अध्ययन पद्धत आता सर्व जगभर वापरली जात आहे. आजच्या जगामध्ये शिक्षणातील बहुतांशी अपयश हे मुलाला अगदी सुरुवातीपासूनच स्वत:ची निरीक्षण क्षमता वापरण्याची आणि स्वत:च्या परीने शोध घेण्याची अनुमती देण्याऐवजी फक्त माहिती मिळविण्यावर अवास्तव भर दिल्यामुळे आहे. जेव्हा शिक्षक आणि विद्यार्थी हातात हात घालून शोध घेण्याचे रोमांचकारी साहस अनुभवतात, आकलनाची तेजस्वी चमक अनुभवतात, तेव्हा त्या बालकाच्या विकासाची अवस्था परिपूर्ण उत्तम असते असे समजावे. बालक जर सुरुवातीलाच केवळ माहितीनेच भरून गेले आणि त्याला जर प्रत्येक गोष्ट कशी करायची ते सांगितले गेले तर मग आपण त्याला या शोध अध्ययनाच्या खेळात भागच घेऊ देत नाही असे होईल. या सभोवतालच्या भौतिक विश्वातील गोष्टींचा शोध लावण्याचा हा 'शोध' खेळ म्हणजे जणू अंधारातील लपंडावच होय.
शोधाचा हा खेळ शक्यतो विद्यार्थ्याने सहजपणे पण चौकसपणे विचारलेल्या प्रश्नातून सुरू व्हायला हवा. प्रत्येक जण या प्रकल्पाचा आरंभ बिंदू बनू शकतो. मात्र सर्वात महत्वाचे म्हणजे शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये अगदी योग्य नाते निर्माण झाले पाहिजे. या नात्यातून दीर्घकाळपर्यंत स्थिर राहील असे दुतर्फी संप्रेषण शक्य व्हायला हवे. ज्या मुलांचा अशा सहज संप्रेषणाकडे कल नसतो किंवा ज्या मुलांची सृजनशील क्षमता ही अगदी जन्मल्यापासून केवळ माहितीच्या भारामुळे झडून गेलेली असते अशा मुलांच्या बाबतीत शिक्षकां सोबत खऱ्या अर्थाने नाळ जोडली जाण्यासाठी काही वेळ लागतो. अशी मुले धडपणे विरोध ही करू शकत नाहीत. बालकाचे मन हे त्याने स्वत: शोधलेल्या गोष्टीतून घडत राहिले पाहिजे, इतरांनी शोधलेल्या गोष्टीतून नव्हे. हा शोध अध्ययनाचा मार्ग अनुसरला तरच बालकातील निरीक्षण क्षमता, रसग्रहण क्षमता आणि तर्कशक्ती यांचा विकास होईल. असे झाल्याने ते मूल कोणत्याही नवीन माहितीचा त्याच्या स्वत:च्या माहितीशी आणि अनुभवाशी संबंध जोडू शकेल आणि हा शोध घेण्याचा खेळ त्याच्या आवडीच्या कोणत्याही विषयात चालू ठेऊ शकते मग ते विज्ञान, वैद्यकीय, गणित, इतिहास, अर्थशास्त्र काहीही असो.

15. What are the effects of creative revolution in education in India ?
भारतातील शिक्षणातील सृजनशील क्रांतीमुळे कोणते परिणाम घडून आले आहेत ?

16. Why is there failure in education today ?
आज शिक्षणामध्ये अपयश कशामुळे आले आहे ?

17. What should be the nature of discovery learning ?
शोध अध्ययनाचे स्वरूप कसे असावे ?

18. What is the role of teacher in discovery learning ?
शोध अध्ययनामध्ये शिक्षकाची भूमिका काय असते ?

19. Which are the principles of education discussed in the above paragraph ?
वरील परिच्छेदामध्ये कोणत्या शैक्षणिक तत्त्वांची चर्चा केली आहे ?

ROUGH WORK

ROUGH WORK